# तेर येथील मंदिर स्थापत्यात मध्ययुगीन कालखंडात झालेले जतनकाम.

**श्री अमोल नारायण गोटे**
( एम.ए. प्राचीन भारतीय इतिहास,संस्कृती व पुरातत्वशास्त्र )
पत्ता :- मु.पो. माढा, ता.माढा, जिल्हा सोलापुर
संपर्क - 9545442833, 8999009186
मेल – amolgote1990@gmail.com

**पार्श्वभुमी:-**

संत श्रेष्ठ श्री.संत गोरोबा काका यांचा सहवास लाभलेल्या तेर नगरीला ऐतिहासिक व धार्मिक वारसा आहे. येथे अनेक प्राचीन मंदिरे असून पुरातत्वीय अवशेष सापडलेले आहेत. प्राचीन काळी तगर हे प्रमुख व्यापारी केंद्र होते. याशिवाय संत परंपरेत तेर नगरीला अनन्य साधारण महत्व आहे. येथे बौध्द, जैन, शैव, शाक्त, वैष्णव अशा सर्व धार्मिक संप्रदायाशी निगडीत वास्तु आढळून येतात. आजपर्यंत तेरचे विविध पुरातत्वज्ञ, संशोधक यांनी अन्वेषण / उत्खनन केले आहे. यात सर्वात प्रथम तेरची पाहणी कझिंन्स यांनी नोव्हेंबर 1901 मध्ये करून 1902-03 च्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या वार्षिक वृत्ततांमध्ये सविस्तर माहिती प्रसिध्द करून प्राचीन तगर म्हणजेच आजचे तेर होय हे सिध्द केले. यानंतर खऱ्या अर्थाने जगभरातील संशोधकांची पाऊले तेरकडे वळली व आजदेखील यावर संशोधन सुरूच आहे. आजपर्यंत तेर या ठिकाणी 1958 ते 2015 पर्यंत ८ वेळा उत्खनन करण्यात आले आहे. आजपर्यंत उत्खनन व इतर पुराव्यांच्या आधारे तेरची प्राचीनता इ.स.पूर्व बरीच मागे नेता आली आहे. तेरला असलेली देवालये इ.स.चे 5/6 वे शतकापासून ते इ.स.चे 17/18वे शतक या काळापर्यंत दिसून येतात. त्यानंतर इ.स.चे 17/18वे शतकातील मंदिर स्थापत्य् मोठया प्रमाणात दिसते. परंतु 11 ते 15 व्या शतकातील मंदिर स्थापत्य अवशेषरुपीच दिसून येते. या काळातील मंदिरे तेर तथा परीसरात मोठया प्रमाणात होती हे तेर परीसरात आढळून येणाऱ्या तत्कालीन मंदिर अवशेष यावरुण दिसते. सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या सिध्देश्वर मंदिर, नृसिंह मंदिर, चंद्रेश्वर मंदिर व इतर काही मंदिरात 11 ते 15 व्या शतकातील मुळ भग्न मंदिर अवशेष या ठीकाणी या ठीकाणी असणारी मुळ मंदिरे अनेक कारणांमुळे नष्ट झाली असावीत नंतर स्थानिकांनी या मंदिरांची तत्कालीन काळात प्रचलित असणाऱ्या वास्तुशास्त्रानुसार तथा मुळ मंदिराचे शेष अवशेष यांचा उपयोग करुण नष्ट झालेल्या अथवा केलेल्या मंदिरांची जतनकामे करण्यात आली असल्याचे पूरातत्वीय संशोधनानुसार मांडण्याचा प्रयत्न् केला आहे.

भौगोलिक पार्श्वभूमी :

पेरीप्लस व टॉलेमीच्या भूगोल या इ.स. च्या पहिल्या व दुसऱ्या शतकातील ग्रीक ग्रंथात दक्षिणेतील एक अग्रगण्य व्यापारी पेठ म्हणून ज्याचे वर्णन करण्यात आले आहे ते तगर म्हणजे तेर होय. ही बाब आता सर्वमान्य झाली आहे. कुठल्याही संस्कृतीच्या प्रगतीमध्ये भौगोलिक वैशिष्ट्य यांचा वाटा महत्त्वपूर्ण असतो.

तेर हे मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात असून उस्मानाबाद पासून 25 कि.मी. अंतरावर ईशान्येस स्थित आहे. तेर हे तेरणा (मांजराची उपनदी) नदीच्या दक्षिणतीरावर वसले आहे. सध्या तेरची वस्ती 12 ते 15 हजार आहे.तेरची भौगोलिक पार्श्वभूमी पाहताना प्राचीन दक्षिणापथ, मराठवाडा आणि तेर (उस्मानाबाद) या संदर्भात विचार

करावा लागतो. उस्मानाबाद जिल्ह्याचा बहुतांशी भाग सह्याद्रीच्या शाखा असणाऱ्या बालाघाटच्या डोंगररांगांनी व्याप्त आहे. प्राचीन जनपद अश्मक (तेर) याच परिसरात मोडते. यालाच "बालागिरी" पर्वताची रांग असेही म्हणतात.

1. **नृसिंह मंदिर**

स्थान :- नृसिंह मंदिर हे महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद शहरापासून 25 की. मी. अंतरावर असणाऱ्या तेर या गावातील तेरच्या आग्नेय दिशेस तेरपासुन 1 की.मी.अंतरावर तेरणा व पिल्लोळा (पिप्पलजा) या नदीच्या संगमावर स्थित आहे.

**रचना**

हे मंदिर पुर्वाभिमुख आहे. या मंदिराची रचना मुखमंडप व गर्भगृह अशी आहे. या मंदिर परीसरात एक शिवमंदिर व काही मुर्तीशिल्पे आहेत. या मंदिराच्या पुढील बाजुस ओवऱ्या तसेच पुर्ण मंदिरास तटबंदी आहे.

प्रवेशव्दार :-

या मंदिरात प्रवेश करण्यासाठी उत्त्र दिशेला प्रवेशव्दार असून या प्रवेशव्दाराची रचना वैशिष्टयपुर्ण असल्याचे दिसून येते. सात पायऱ्या चढून गेल्यानंतर हे प्रवेशव्दार लागते. या प्रवेशव्दाराच्या दोन्ही बाजुला 114 से.मी. रुंदीचे चौकोणी कक्षासन आहेत. हे पुर्ण प्रवेशव्दार अतिशय भव्य आहे. याची रुंदी 404 से. मी. आहे. या भव्य अश्या प्रवेशव्दारातुन मंदिरात प्रवेश करण्यासाठी 60 से.मी. रुंदीच्या व 100 से.मी. उंचीच्या अतिशय लहान प्रवेशव्दारातुन वाकुन मंदिर परीसरात प्रवेश करावा लागतो. या अरुंद प्रवेशव्दाराच्या दोन्ही बाजुस गर्भगृहाच्या व्दारशाखा लावण्यात आल्या आहेत. या व्दारशाखेत स्तंभअंकणासोबत पुरुष व्दारपाल आहेत. उजव्या बाजुचा व्दारपाल स्थानक, अर्धसमपद,त्रिभंग, चतुर्भुज आहे. त्याचा खालचा उजवा हात अभयमुद्रेत असून हातात अक्षमाला, वरच्या उजव्या हातात सर्प, वरच्या डाव्या हातात चक्र, खालच्या डाव्या हातात गदा ही आयुधे आहेत. डोक्यावर कीरीट मुकुट, कानात चक्रकुंडले व इतर वस्त्राअलंकार आहेत. गळयात नरमुंडमाळ आहे. उजव्या बाजूस चामरधारी आहे. डाव्या बाजुचा व्दारपाल स्थानक, अर्धसमपद,त्रिभंग, चतुर्भुज आहे. खालच्या उजव्या हातात गदा, वरच्या उजव्या हातात त्रिशुळ, डाव्या वरच्या हातात सर्प, डावा खालचा हात अभयमुद्रेत असून हातात अक्षमाला आहे. डोक्यावर कीरीट मुकुट, कानात चक्रकुंडले व इतर वस्त्राअलंकार आहेत. गळयातनरमुंडमाळआहे. या व्दारशाखेच्या वर 133 से.मी. रुंदीच्या व 163 से.मी. उंचीच्या भागात 18 से.मी. जाडीचे दगडी काम केले असून यामध्ये वरील भागात महिरपी कमाण दिसते. याच्यावरती एक मोठी महिरपी कमाण व दोन्ही बाजुस 70 से.मी. जाडीचा दगडी कामाचा थर आहे. वरील भागात सात हस्त आहेत. (छायाचित्र क्रमांक 1)

नृसिंह मंदिर :- या मंदिराची रचना सभामंडप व गर्भगृह अशी आहे.

सभामंडप :-

हा सभामंडप आतील बाजुने 760 से.मी. रुंद व 570 से.मी. लांबीचा तर बाहेरील बाजुने 1016 से.मी. रुंद व 720 से.मी. लांबीचा आहे. सभामंडपाच्या भिंतीची जाडी 120 से.मी. असल्याचे दिसून येते. सभामंडपात 60 से.मी. लांबी व रुंदीचे चौकोणी चार पुर्ण स्तंभ आहेत व 8 अर्धस्तंभ आहेत. प्रत्येक चार स्तंभावर एका घुमटाची रचना केली आहे. या सभामंडपात व्दारशाखेच्या दोन्ही बाजुस 56 से.मी. लांब व 36 से. मी. रुंदीच्या देवकोष्टात उजव्या बाजुस गणपती आहे.तो आसनस्थ, चतुर्भुज आहे. यास मोठया प्रमाणात शेंदुर लावल्यामुळे याची वैशिष्टये दिसत नाहीत. डाव्या

बाजुच्या देवकोष्टात शिवपार्वती अलिंगण मुद्रेत आहेत. या दोन्ही मुर्ती 13/14 व्या शतकातील आहेत. (छायाचित्र क्र-2

गर्भगृह

या मंदिराच्या गर्भगृहात प्रवेश करण्यासाठी 50 से. मी.रुंदीचे व 100 से.मी. उंचीच्या अरुंद व्दारशाखेतुन गर्भगृह प्रवेश होतो. या मंदिराचे गर्भगृह आतील बाजुस चौरस आहे. गर्भगृहात मध्यभागी उंच चौथऱ्यावर केवल नृसिंह मुर्ती विराजमान आहे. (विष्णुच्या दशावतारापैकी नृसिंह हा उग्र अवतार आहे.) ही मुर्ती व्दीभुज असून या मुर्तीचा उजवा पायाचा भाग तर डावा हाताचा व पोटाचा भाग भग्न झालेला आहे. यावर लेपन केले आहे. ही मुर्ती 12/13 व्या शतकातील असावी. (छायाचित्र क्रमांक 3 ) या मुर्तीबाबत अनेक लोककथा प्रचलित आहेत. मि.हेन्री कझिन्स यांनी देखिल या लोककथांचा उल्लेख केला आहे. “तेर महात्म्यात”() याबाबत कथा आलेल्या आहेत. व्दारशाखा अतिशय साधी आहे. यावर कोणतेही नक्षीकाम नाही. ललाटबिंबावर गणेश आहे.

बाहयभाग :- गर्भगृहाच्या बाहय्भागात क्षिप्त उक्षिप्त होत जाणाऱ्या भागांची रचना करण्यात आली आहे. हा भाग पुर्ण सपाट आहे.

शिखर :-

या मंदिराच्या शिखराची रचना तीन टप्प्यात करण्यात आली आहे. या प्रत्येक टप्प्यात ठराविक अंतरावर आत आत जाणाऱ्या 7 टप्प्यांची रचना केली आहे. त्यावरती अष्टकोणी भाग व सर्वात वरती आमलक आहे. गर्भगृहाच्या बाहयभागात क्षिप् उक्षिप्त होत जाणाऱ्या रेषा नागर शैलीतील शिखर रचनेप्रमाणे शिखराच्या वरील भागात आमलकापर्यंत गेलेल्या दिसून येतात. चार दिशेला चार उपशिखरांची रचना केलेली दिसते. मराठा कालखंडात मंदिर स्थापत्यात शिखर रचनेत चार बाजुस मिनार दिसतात. त्याऐवजी त्या प्रभावातुन या ठीकाणी बदल करण्यात येउन उपशिखरांची रचना केली असावी. हे शिखर मराठा कालखंडात निर्माण झालेल्या स्थापत्य् शैलीच्या प्रभावातुन तयार झाले असल्याचे वास्तुशास्त्रीय निरीक्षणातुन इथे नमुद करावे वाटते. या शिखर रचनेवर द्राविड शैलीचा प्रभाव दिसतो. (छायाचित्र क्रमांक 4 )

तुळशीवृदांवन

या मंदिरासमोर 146 से.मी. लांबी व रुंदीचे चौकोणी जोते व त्यावर 75 से.मी. लांबी व रुंदीचे चौकोणी व उंची 156 से.मी. असणारे तुळशी वृंदावन आहे. या तुळशी वृंदावनाच्या मधल्या भागात नृसिंह मंदिराकडे तोंड करुन 56 से.मी. लांबी व 36 से.मी. रुंदीचे मारूतीचे शिल्प् आहे. या समोर मंदिराकडे तोंड करुन एक सुरेख 53 से.मी. लांबी व 46 से.मी. रुंदीचे कासवाचे शिल्प कोरण्यात आले आहे.

भैरवमुर्ती

या मंदिरात प्रदक्षिणा मार्गावर 38 से.मी. लांबी व 35 से.मी. रुंदीची भैरवाची मुर्ती आहे. ही स्थानक, अर्धसमपद, त्रिभंग तथा चतुर्भुज आहे. . उजव्या खालच्या हातात सुरा, उजव्या वरच्या हातात डमरु, डाव्या वरच्या हातात सर्प, डावा खालचा हातात पात्र आहे. डोक्यावर जटा मुकुट, कानात चक्रकुंडले व इतर वस्त्राअलंकार आहेत. डोक्यामागे प्रभावलय आहे. मुर्तीच्या लक्षणावरुन या मुर्तीचा कालखंड इ.स. 15/16 वे शतक असावा.

शिवमंदिर :-

नृसिंह मंदिराच्या मागील बाजुस एक शिवमंदिर आहे. याची रचना फक्त गर्भगृह अशी आहे. हे गर्भगृह आतील बाजुने चौकोणी असुण 150 से.मी. लांबी, रुंदी आहे. तर या गर्भगृहाची बाहेरील मोजमापे 298से.मी. लांबी व 304 से.मी.रुंदी अशी आहेत. या गर्भगृहातील शिवलिंगाची 75 से.मी. लांबी व 50 से.मी. रुंदी आहे. या गर्भगृहाला दोन

शाखा असणारी व्दारशाखा आहे. यात प्रथम स्तंभअंकण तर दुसरी शाखा खाली व्दारपाल व वरील बाजुस स्तंभअंकण अशी रचना आहे. याची मोजमापे 93 से.मी. लांबी व 127 से.मी.रुंदी अशी आहेत. उजव्या बाजुच्या व्दारशाखेचा हा भाग उलटा बसविण्यात आला आहे. यावरील स्तंभअंकणावर भौमितिक नक्षीकाम आहे.यावरील व्दारपालाची/ चामरधारीची मुर्ती पुर्णपणे भग्न झालेली आहे. डाव्या बाजुस व्दारशाखेवर चामरधारी स्थानक असून तिच्या उजव्या हातात चामर आहे. याच्या बाजुच्या शाखेवर स्तंभअंकणावर गजव्याल, सिंहव्याल आहेत. ललाटबिंबावर गणपती आहे. समोर चौथऱ्यावर नंदी आहे.

या मंदिराच्या व्दारशाखेचे बारकाईने निरीक्षण केल्यास असे दिसून येते की या मंदिर स्थापत्याकरीता वापरण्यात आलेली व्दारशाखा व मंदिराचा कालखंड यामध्ये तफावत आहे. त्याचबरोबर व्दारशाखेची उजवी बाजु उलटी बसवली आहे. दोन्ही शाखा यांची रचना बघितली असता दोन्हीं बाजुच्या रचनेत बदल आहे. (छायाचित्र क्रमांक 5 व 6 )

तटबंदी :-

या मंदिरास चारही बाजुस तटबंदी आहे. मंदिराच्या पुढील भागात 4 ओवऱ्या आहेत यातील प्रत्येक ओवरीची रचना महिरपी कमाण व डोम अशी आहे. प्रत्येक ओवरी चौरस असून यांची लांबी,रुंदी 190 से.मी. आहे.

1. **सिध्देश्वर मंदिर**

स्थान :- हे मंदिर तेर गावात प्रवेश करतेवेळी तेर-उस्मानाबाद रोडवर प्राथमिक शाळेच्या मागील बाजुस आहे.

रचना :- या मंदिराची रचना सभामंडप, अंतराळ व गर्भगृह अशी आहे. संपुर्ण मंदिर 12.26 मीटर लांबीचे आहे.

सभामंडपाचीव्दारशाखा

या मंदिराच्या सभामंडपास लावण्यात आलेल्या 1.30 मीटर रुंद व 1.40 मीटर उंचीच्या प्रवेशव्दारातुन मंदिरात प्रवेश होतो. मंदिराच्या गर्भगृहास असणाऱ्या व्दारशाखांचा उपयोग या ठीकाणी करण्यात आलेला दिसतो. ही व्दीदल व्दारशाखा आहे. या व्दारशाखेच्या स्तंभअंकणासोबत पुरुष व्दारपाल आहेत. उजव्या बाजुचा व्दारपाल स्थानक, अर्धसमपद, त्रिभंग, चतुर्भुज आहे. उजवा खालचा हात अभयमुद्रेत आहे. उजव्या वरच्या हातात चक्र, डाव्या वरच्या हातात शंख, डाव्या खालच्या हातात गदा ही आयुधे आहेत. डोक्यावर कीरीट मुकुट, कानात चक्रकुंडले व इतर वस्त्र अलंकार आहेत. डाव्या बाजुचा व्दारपाल स्थानक, अर्धसमपद,त्रिभंग, चतुर्भुज आहे. उजव्या खालच्या हातात गदा, उजव्या वरच्या डमरु, डाव्या वरच्या हातात सर्प, डावा खालचा हात अभयमुद्रेत आहे. डोक्यावर कीरीट मुकुट, कानात चक्रकुंडले व इतर वस्त्र अलंकार आहेत. या व्दारशाखेच्या उंबऱ्यावर शंकरपाळयाच्या आकाराचे नक्षीकाम व हत्ती तसेच व्याल यांचे अंकण केले आहे. ललाटबिंबावर गणपती आहे. या व्दारशाखेच्या समोर 0.41 मीटर रुंद व 0.96 मीटर लांबीची चंद्रशीळा असून त्यास शंखाचे अलंकरण केले आहे. या समोर लहानशा चौथऱ्यावर नंदी आहे. (छायाचित्र क्रमांक 7 )

सभामंडप :-

या मंदिराचा सभामंडप पुर्णपणे बंदिस्त आहे. याची बाहेरुण 6.9 मीटर रुंदी व 7.40 मीटर लांबी आहे तर आतुन 4.70 मीटर रुंदी व 5.30 मीटर लांबी असून याच्या भिंतीची जाडी 1.04 मीटर आहे. यासाठी वीटांचा वापर करण्यात आला आहे. या सभामंडपात 2.70 मीटरच्या चौकोणी भागात पाषाणाचे चार स्तंभ आहेत. हे स्तंभ 0.34 मीटरचे चौकोणी असुण 2.7 मीटर उंचीचे आहेत. यांची रचना चौकोणी भाग, त्यावर अष्टकोणी, गोलाकार कडी, त्यावर शंकरपाळयाची नक्षी असलेला अष्टकोणी भाग, त्यावर गोल, त्यानंतर चौकोणी स्तंभमध्य आहे. या स्तंभमध्यावर हत्ती, बदक, कथाचित्रण व कीर्तीमुखाचे अंकण केलेले दिसते.यावर अष्टकोणी, गोलाकार भागावर त्रिकोणी नक्षी, यावर कडी,

गोलाकार, चौकोणी भाग व यावर भारवाहक तथा नर वानराचे मल्लयुध्दाचे प्रसंग दिसतात. (छायाचित्र क्रमांक 8 ) प्रत्येक स्तंभावरील नक्षीकाम काही प्रमाणात बदल असला तरीही यात मोठया प्रमाणात साम्यता दिसते. या चार स्तंभावर आधारीत असणाऱ्या वितानाच्या आडव्या स्तंभावर काही कथाचित्रण, भौमितिक नक्षी दिसते. या सभामंडपातील अर्ध स्तंभ भिंतीत दिसतात. या सभामंडपाची मोठया प्रमाणात क्षती झाली आहे. याचा काही भाग पडला असून वितानाच्या आडव्या स्तंभानाही तडे गेले असून त्यांना इतर स्तंभाच्या सहाय्याने टेकु देण्यात आला आहे. सभामंडप पुर्णपणे बंदिस्त असून याची भिंत वीटांची आहे. आतुन चुन्यामध्ये काम केले आहे.

अंतराळ :- या मंदिराचे अंतराळ आकाराने मोठे असून याची लांबी 3 मीटर व रुंदी 2.42 मीटर आहे. अंतराळात प्रवेश करण्यासाठी अरुंद प्रवेशव्दार आहे. सभामंडपाहून अंतराळाची पातळी उंच आहे. सभामंडपातुन दोन पायऱ्या चढुण गेल्यानंतर अंतराळात प्रवेश होतो. संपुर्ण अंतराळ वीटकामात केले असून यास चुन्याचे लेपण करण्यात आले आहे. याच्या छताचा भाग घुमटाकार आहे. यास चुन्याचे लेपण असून फुलांचे नक्षीकाम केले आहे.

गर्भगृह :-

गर्भगृहाची लांबी 2.82 मीटर तर रुंदी 2.42 मीटर आहे गर्भगृहात मध्यभागी शिवलिंग आहे. याची लांबी 1.64 मीटर, रुंदी 1.13 मीटर तर उंची 0.63 मीटर आहे. हे रचनेत चौरस असून तेर या ठीकाणी आकाराने सर्वात मोठया असणाऱ्या शिवलिंगापैकी क्रमांक 2 चे शिवलिंग आहे. (छायाचित्र क्रमांक 9 ) तेर या गावात आढळुन येणारी बहुतांश शिवलिंग ही आकाराने चौरस असल्याचे दिसते. यामध्ये प्रामुख्याने उत्त्रेश्वर मंदिर (इ.स.6 वे शतक), कालेश्व्रर मंदिर (इ.स. 6 वे शतक) यांचा समावेश होतो. गर्भगृहाच्या भिंती सपाट आहेत तसेच वितान आतील बाजुने घुमटाकार आहे. वरील पुर्ण भागात चुन्यामध्ये फुलाचे नक्षीकाम केल्याचे दिसुण येते. गर्भगृहात निर्माण झालेल्या ध्वनीचे प्रतिध्वनी निर्माण होतात अश्या प्रकारच्या घुमटाकार वितानाच्या गर्भगृहाची रचना केली आहे. हे सर्व वास्तुरचनेवरुन 17/18 व्या शतकात जतनकाम केले आहे असे दिसते.

गर्भगृहाचीव्दारशाखा

या मंदिराच्या गर्भगृहास लावण्यात आलेल्या 1.30 मीटर रुंद व 1.40 मीटर उंचीच्या प्रवेशव्दारातुन गर्भगृहात प्रवेश होतो. ही व्दीदल व्दारशाखा आहे. पहिल्या शाखेत भौमितिक नक्षीसह इतर अलंकरण व वरील भागात व्याल आहेत. या व्दारशाखेत स्तंभअंकणासोबत चामरधारी आहे. ही स्थानक, अर्धसमपद,त्रिभंग, व्दीभुज आहे. उजव्या हातात चामर आहे. डाव्या हातात बीजपूरक असावे. या चामरधारीने डोक्यावर केसांचा बुचडा बांधला आहे. इतर वस्त्र अलंकार आहेत. वरील भागात स्तंभअंकण आहे.डाव्या बाजुच्या पहिल्या शाखेत खालील भागात गणेशाचे अंकण तथा वरील भागात स्तंभअंकण आहे. दुसऱ्या शाखेत व्दारपाल स्थानक, अर्धसमपद,त्रिभंग, चतुर्भुज आहे. उजव्या खालच्या हातात गदा, उजव्या वरच्या त्रिशुळ, डाव्या वरच्या हातात डमरु, डावा खालचा हात अभयमुद्रेत असून हातात अक्षमाला आहे. डोक्यावर कीरीट मुकुट, कानात चक्रकुंडले व इतर वस्त्र अलंकार आहेत. ललाटबिंबावर गणपती आहे. या व्दारशाखेच्या समोर 0.41 मीटर रुंद व 0.96 मीटर लांबीची चंद्रशीळा असून त्यास शंखाचे अलंकरण केले आहे. (छायाचित्र क्रमांक 10 )

**मध्ययुगीन कालखंडात झालेले जतनकाम :-**

सद्यस्थितीत नृसिंह मंदिराचे पुरातत्वीय व वास्तुशास्त्रीय दृष्टीने निरीक्षण केल्यास अनेक बाबी समोर येतात. या मंदिरात प्रवेश करण्यासाठी तटभिंतीस असणाऱ्या प्रवेशव्दाराची रचना यावरुन असे दिसते की हे प्रवेशव्दार तत्कालीन कालखंडात घडलेल्या अनेक घटनांची साक्ष देत उभे आहे असे म्हणावे लागेल. यास दोन्ही बाजुस चौरस कक्षासन आहेत. गर्भगृहास असणारी व्दारशाखा या ठीकाणी लावण्यात आली आहे. ही व्दारशाखा साधारणपणे 12/13 व्या शतकातील असावी. याच्या वर एक लहान महिरपी कमाण, त्यावर आणखी एक मोठी कमाण अशी रचना आहे. या महिरपी कमाणी विजापूर कमाणीच्या शैलीवरुण प्रभावित होउन 18/19 व्या शतकात प्रभावित झालेल्या महाराष्ट्रातील अनेक मराठा तथा तत्कालीन वास्तुरचनेत दिसते. प्रथमदर्शनी हे प्रवेशव्दार एखाद्या तटबंदीयुक्त वाडयाचे वा गढीचे प्रवेशव्दार वाटते. या स्थापत्यात या परीसरात मिळालेल्या 12/13 व्या शतकातील मंदिराच्या व्दारशाखेचा उपयोग केला गेला असून याबरोबरच तत्कालीन काळात प्रभावित झालेल्या शैलीत सदर व्दारशाखेचे जतनकाम केले आहे असे दिसून येते. नृसिंह मुर्ती, मंदिराचे गर्भगृह तथा सभामंडप आणि इतर मंदिर यांच्या स्थापत्य रचनेत बदल दिसतो. नृसिंह मुर्ती,देवकोष्टातील शिव-पार्वती व गणपती , प्रवेशव्दाराची व्दारशाखा, या मंदिराच्या मागील बाजुस असणाऱ्या शिवमंदिराची व्दारशाखा या 12/13 व्या शतकातील यादव काळातील असाव्यात असे मुर्तीलक्षणे व शिल्पकलेवरुन दिसून येते. मंदिराचे प्रवेशव्दार, ओवऱ्या, सभामंडप, शिखर, मागील महादेव मंदिर, भैरवमुर्ती, तुळशी वृदांवन, कासव या सर्व 18/19 व्या शतकातील असाव्यात असे स्थापत्य रचना व कलाशैलीवरुन दिसते. सद्यस्थितीत नृसिंह मंदिर तेरणा नदी व तेर महात्म्यात उल्लेखित पिल्लोळा या दोन नद्यांच्या संगमावर स्थित आहे. महाराष्ट्रातील नीरा नरसिंगपूर येथील नृसिंहाचे प्रसिध्द असणारे तीर्थक्षेत्र हे नीरा-भीमा संगमावर आहे व इतरही नृसिंह मंदिरे ही दोन नद्यांच्या पवित्र संगमावर असल्याचे दिसुण येते. साधरणपणे यादव काळात नृसिंह मंदिर तेरमधील याच ठीकाणी स्थित होते व हे मंदिर तत्कालीन काळात घडलेल्या अनेक कारणामुळे नष्ट झाले. त्यानंतर 18/19 व्या शतकात या ठीकाणी जीर्ण मंदिराचे भग्न अवशेष यांचा उपयोग करण्यात आला. तसेच या काळात प्रचलित स्थापत्य् शैलीत या मंदिराचे जतनकाम केले आहे असे या संशोधणातुन दिसून येते.

सद्यस्थितीत असलेल्या सिध्देश्वर मंदिराचे पुरातत्वीय व वास्तुशास्त्रीय दृष्टीने निरीक्षण केल्यास अनेक बाबी समोर येतात. या मंदिराचे मध्ययुगीन काळात मोठया प्रमाणत जतनकाम केले आहे. या मंदिराची सद्यस्थितीतील स्थापत्य रचना खूप वेगळी दिसते. या मंदिराच्या अगदी जवळ आल्यावर सभामंडपाची व्दारशाखा नजरेस पडल्यानंतर हे मंदिर असल्याचे दिसते. सभामंडपाचे प्रवेशव्दार अरुंद आहे. यास व्दारशाखा लावण्यात आली असून समोर चंद्रशिळाही या ठीकाणी आहे. हा भाग साधारणपणे 12/13 व्या शतकातील असावा. सभामंडपात प्रवेश करण्यासाठी दोन पायऱ्या उतरुन जावे लागते. अंतराळ व गर्भगृह हे सभामंडपापेक्षा उंचावर आहे. बहुतांश शिवमंदिरांची गर्भगृहे ही खोलीवर असतात. या ठीकाणी ही बाब उलट दिसून येते. सभामंडपात या ठीकाणी दोन कालखंडातील वास्तुरचनेत झालेला बदल स्पष्टपणे दिसतो. मध्यभागी असणारे चार पाषाणाचे स्तंभ व अर्धस्तंभ आणि यावर स्थित असणारे वितान

हे मुळत: साधारणपणे 12/13 व्या शतकातील असल्याचे वास्तुशास्त्रीय तथा शिल्पकलेवरुन दिसते. बाजुने उभी करण्यात आलेली भिंत व छताचा काही भाग, त्याचबरोबर अंतराळ व गर्भगृह हा भाग पुर्णपणे 17/18 व्या शतकात बांधल्याचे दिसते. गर्भगृहाची व्दारशाखा, गर्भगृहातील दगडी फरशी व शिवलिंग हे मात्र मुळ मंदिराचे असावेत असे दिसते. अंतराळ व गर्भगृहाच्या भिंती व छताचा भाग हा वीटा, चुना, माती व इतर साहीत्यातासह झालेल्या 17/18 व्या शतकात जतनकामातील असावा असे दिसते. या ठीकाणी मुळत: एक शिवमंदिर तथा इतर मंदिर असावे कारण या ठीकाणी प्रवेशव्दार व गर्भगृह अश्या दोन ठीकाणी वेगवेगळया व्दारशाखांचा वापर केला आहे. या मुळ मंदिराची उभारणी ही 12/13 व्या शतकातील असावी. कालातंराने तत्कालीन काळात घडलेल्या काही घटनांमुळे मुळ मंदिर नष्ट झाले कींवा केले गेले असावे तरीही कोणत्याही ठोस पुराव्याअभावी स्पष्टपणे विधान करता येणार नाही. त्यानंतर 17/18 व्या शतकात मुळ मंदिराचे काही भाग यांचा वापर करण्यात आल्याचे तथा तत्कालीन काळात प्रचलित वास्तुरचनेप्रमाणे जतनकाम केले आहे असे या संशोधणातुन दिसून येते.

तेरला फार मोठा वैभवशाली ऐतिहासिक वारसा लाभला आहे हे आजपर्यंत तेरवर झालेल्या अनेक संशोधनातुन दिसून येते. तेर या ठीकाणी साधारणपणे उत्त्र मौर्यं काळापासूप सुरु असलेले वसाहतीकरण पुढेही अव्याहतपणे सुरु होते. 11 ते 15 व्या शतकात या तेरच्या भुमीत मोठया प्रमाणात मंदिरांची निर्मिती करण्यात आली हे तेर येथे आज दिसणाऱ्या वर उल्लेखित मंदिराव्यृतिरीक्त् त्रिविक्रम मंदिर, उत्त् रेश्व्र मंदिर, संत गोरोबाकाका व कालेश्व्र मंदिर समुह, गणेश मंदिर, जैन मंदिर व गावातील इतर ठीकाणी ठिकाणी आढळून येणाऱ्या या काळातील मंदिर अवशेष यातून दिसून येते. ही मंदिरे तेर हा भाग मध्ययुगीन कालखंडात हैद्राबाद निजामाच्या अधिपत्याखाली होता. या काळात कींवा त्यापुर्वी या ठीकाणी असणारी मुळ मंदिरे अनेक कारणांमुळे नष्ट झाली असावीत कींवा मुस्लीम आक्रमणात यांचा विध्वंस करण्यात आला. नंतर स्थानिकांनी या मंदिरांची तत्कालीन काळात प्रचलित असणाऱ्या वास्तुशास्त्रानुसार तथा मुळ मंदिराचे शेष अवशेष यांचा उपयोग करुन नष्ट झालेल्या अथवा केलेल्या मंदिरांचे जतनकाम करण्यात आले हे वरील संशोधनावरुन दिसते.

**संदर्भ सुची:-**

**1) देव. शां. भा.( प्रकाशन वर्ष दिले नाही.) - तेर - पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय,महाराष्ट्र राज्य्, मुंबई. ( प्रकाशन वर्ष दिले नाही.)**

**2) प्रा.सौ. सुलभा जामवाडीकर - सुवर्णनगरी तेर - श्रीलक्ष्मी प्रकाशन, औरंगाबाद. ( प्रकाशन वर्ष दिले नाही.)**

**3) डॉ. माया पाटील ( शहापूरकर )-मंदिर - शिल्पे मराठवाडयातील काही शिल्पे आणि मंदिरस्थापत्य ) - ग्रंथाली प्रकाशन, मुंबई (16 एप्रिल 2014 )**

4) AVINASH SOWANI - MARATHA ARCHITECTURE (During A.D.1650 and A.D. 1818) PHD Thesis.

**छायाचित्रे**




1. नृसिंह मंदिर प्रवेशव्दार 2.नृसिंह मंदिर सभामंडप





3. केवल नृसिंह मुर्ती 4.बाहयभाग व शिखर 5. मागील शिवमंदिर



6.सिध्देश्वर मंदिर



7.सभामंडपातील स्तंभरचना



8.शिवलिंग



9.गर्भगृहाची व्दारशाखा